**खटला क्र. २८९/पीडब्ल्यु/२०२५** **निशाणी क्र. १९१**

साक्षीदार क्र. १७

मी शपथपुर्वक सांगतो की,

माझे नाव : अनुजा अविनाश राणे,

वय : ३० वर्षे,

व्यवसाय : नोकरी.

पत्ता : विलेपार्ले, मुंबई.

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील यांचे तर्फे:–**

१. मी गोखले आणि साठे चार्टर्ड अंकाउंट फर्म मध्ये काम करते. त्याचे पार्टनर चिन्मय देवल हे आहेत. मी आरोपी प्रज्योत याला ओळखते. आरोपी हा रचना संसद अकॅडमी मध्ये नोकरीला होता. ते आम्हाला त्यांचा संस्थेचा ऑडीट साठी डेटा देत होते. ते आम्हाला डाटा हा ईमेल द्वारे अगर फाईल द्वारे देत होते.

२. दि. ०५/०६/२०२४ रोजी त्यांनी मला टीडीस चलन, बॅक स्टेटमेंट, बॅक बॅलन्स कंर्फमेशन ही माहिती मला ऑफिसच्या मेल आयडिवर पाठविली. आमच्या ऑफिसचा इमेल आयडी anuja.rane@gokhalesathe.in. असा होता. आता मला **नि.क्र. ७२** कडील इमेलची प्रत दाखविण्यात आली ती मला यापुर्वी पाठविण्यात आली होती. मला **नि.क्र. ७१,७८,७९,८१,८२,८३** हे कागद ईमेलद्वारे पाठविण्यात आले होते. मी या संदर्भात पुरावा कायदयाप्रमाणे सर्टिफिकेट दिलेले आहे त्याला **नि.क्र. १९२** देण्यात येत आहे.

३. दि. ०८/११/२०२४ रोजी मला चिन्मय सर यांचा आरोपी कंपनीमध्ये जायचे आहे असा फोन आला होता. त्यामुळे मी त्यांच्या ऑफिसमध्ये गेले होते. त्यावेळी आरोपी यांनी confession दिले होते.

**उलटतपास आरोपीकरीता ॲड. अजय वर्मा यांचेतर्फे :–**

४. मी सदरहू फर्म मध्ये ५ वर्षे काम करत आहे. मी सिनियर मॅनेजर म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आम्हाला कागदपत्र देताना त्याची माहिती देवून ती देत होता. हे म्हणणे खरे आहे की,
आरोपीने दिलेल्या कागदपत्राची खात्री करून आम्ही आमचा रिपोर्ट तयार करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०८/११/२०२४ रोजी आरोपीच्या ऑफिसला

जाताना कशासाठी जायचे आहे याची मला माहिती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी देवल सरांच्या सांगण्यावरून आरोपीच्या ऑफिसमध्ये गेले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीच्या ऑफिस मध्ये जे कामकाज झाले त्यामध्ये सहभागी झाले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मी त्यावेळेस कोणतीही कागदपत्र माझ्या ताब्यात घेतली नव्हती अगर कोणतेही कागदपत्र तपासले नव्हते व पडताळणी केली नव्हती. पोलीसांनी दि. ०८/११/२०२४ नंतर पासून आजपर्यंत माझा जबाब घेतलेला नाही. मी कोणत्याही प्रकारचा कागद कोर्टात अगर पोलीस स्टेशनला जमा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, चिन्मय देवल यांच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, **नि.क्र. नि.क्र. ७१,७८,७९,८१,८२,८३** ही कागदपत्रे बनावट व खोटी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास:—</u>**

५. काही नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

**स्वाक्षरी/—**
**(अ. अ. मेहेंदळे)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १८/०७/२०२६.**